# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** देवळा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0016 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/01/2025 03:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 18/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/01/2025
**Time From (वेळेपासून):** 15:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/01/2025 **Time (वेळ):** 02:00 बजे
(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/01/2025 02:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** देवळा पोलीस स्टेशनचे तळमजल्या,वरील, 14 क्रमांक असलेल्या कर्म, देवळा ,देवळा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रभाकर हिरामण मोरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लायकेश्वर वस्ती ,खामखेडा,देवळा,देवला,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लायकेश्वर वस्ती ,खामखेडा,देवळा,देवला,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9767346182

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास यशवंत जगताप | | | 1. ग्रामपचायत समोर मुंजवाड, सटाणा,सटाणा,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 200 रूपये दराच्या 50 चलनी नोटा | 10,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद देवळा पोलीस ठाणे जि.नाशिक ग्रामिण
दिनांक 19/01/2025

मी, प्रभाकर उर्फ पप्पु हिरामण मोरे वय 31 वर्षे धंदा शेती रा. खामखेडा, लायकेश्वर वस्ती ता. देवळा जि. नाशिक मो.नं. 9767346182

समक्ष हजर राहून तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी सहकुटुंब राहत असून, शेती व्यवसाय करतो. दि. 28/12/2024 रोजी माझे मावशीच्या मुलीला आमचे गावातील सागर रघुनाथ बच्छाव याने छेडले होते म्हणुन दि. 01/01/2025 रोजी मी व माझा मोठा भाऊ धर्मा हिरामण मोरे असे सागर बच्छाव याला समजाविण्यासाठी त्याचे घरी गेलो होतो. त्यावेळी सागर याचा भाऊ समाधान याने मोठया प्रमाणात वाद घालुन, त्याच्या भावाला न समजाविता आम्हाला शिवीगाळ केली म्हणुन आमचेत मारामारी होवुन त्यांना मार लागला होता. त्यानंतर ते पोलीस स्टेशनला आमचे विरुध्द कम्पलेंट देण्यासाठी गेले होते व आम्ही आमचे घरी निघुन आलो होतो.

त्यानंतर दि. 03/01/2025 रोजी मला देवळा पोलीस स्टेशनचे खामखेडा बीटाचे कैलास जगताप पोलीस यांनी फोन केला, त्यांनी बोलविल्याप्रमाणे मी त्यांना सावकी फाटयाजवळ भेटलो असता, त्यांनी मला सांगितले की, तुमच्याविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झालेला आहे. त्या बच्छावला ऐवढे मारायचे असते का ? ते दोघे भाऊ मालेगावला सरकारी दवाखान्यात अॅडमिट आहेत तुझेवर, तुझे भावावर व मामा जिभाउ नंदाळे यांच्याविरुध्द हाफ मर्डर केल्याचे कलम लागु शकते तुझी भानगड मी इथल्या इथ मिटवु शकतो काय करायचे बोल. म्हणुन मी त्यांना विचारले काय करावं लागेल तुम्ही सांगा असे म्हटल्यावर त्यांनी मला तुला खर्च करावा लागेल तुमच्यावर सिरीयस गुन्हयाचे कलम लागु देणार नाही त्याबदल्यात तुला मला 50,000/- रुपये दयावे लागतील. मी घाबरलेलो असल्याने मी त्यांना त्यावेळी 50,000/- रुपये दिले होते. त्यानंतर 5 ते 6 दिवसांनी पुन्हा कैलास जगताप पोलीस यांनी मला फोन करुन देवळा येथे बोलावुन मी तुझे मामाचे नाव गुन्हयातुन काढुन टाकतो त्यांना अटक करणार नाही असे म्हणुन पुन्हा माझेकडे 25,000/- रुपयांची मागणी केली होती व तेव्हा मी त्यांना पुन्हा 25,000/- रुपये दिले होते.

दि. 16/01/2025 रोजी दुपारी 03 वाजताचे सुमारास पुन्हा कैलास जगताप पोलीस यांनी माझे मोबाईल क्रमांक 9767346182 यावर फोन करुन मला रात्री 09 वाजता पोलीस स्टेशनच्या खाली पार्किंगमध्ये भेटण्यासाठी बोलाविले होते. मी तिथे गेल्यावर त्यांनी मला सांगितले की, तुला सर्व प्रकरण कायमचे मिटवायचे असेल, अटक व्हायचे नसेल तर तुला अजुन 1,50,000/- रुपये दयावे लागतील, तेव्हा सर्व प्रकरण मिटेल नाहीतर मी तुला व तुझे भावाला आता सुध्दा अटक करु शकतो असा दम दिल्याने मी घाबरुन माझे एटीएमद्वारे 35,000/- रु व घरुन काही असे एकुण 1,30,000/- रु कैलास जगताप पोलीस यांना दिले होते. व 20000/- रूपये नंतर आणुन देतो असे सांगितले होते. कैलास जगताप पोलीस यांनी उर्वरीत 20,000/- रुपयांकरीता मला त्यांचे मोबाईल नं. 9923694897 यावरुन फोन करुन तगादा लावत असुन मला व माझा भाउ - धर्मा हिरामण मोरे व माझे मामा - जिभाउ नंदाळे अशांना आमचे विरुध्द दाखल गुन्हयात अटक न करता नोटीस देवुन सोडुन देण्यासाठी आधारकार्ड घेवुन बोलवित आहे. त्यावेळी ते माझेकडे उर्वरीत 20,000/- रुपये लाचेची मागणी करतील याची मला खात्री असल्याने व मला त्यांना पुन्हा लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेसंदर्भात मी नाशिक लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उप अधिक्षक श्री एकनाथ पाटील सो यांचेकडे दि. 18/01/2025 रोजी पंचासमक्ष तक्रार दिली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीचे अनुशंगाने कैलास जगताप पोलीस हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणे कामी दिनांक 18/01/2025 रोजी मला व माझा भाउ धर्मा हिरामण मोरे यास व मामा जिभाउ



Scanned with CamScanner

नंदाळे आमचे सोबत पंच श्री. जितेश पांडुरंग मराठे अशांना श्री पाटील सो यांनी पडताळणी कारवाईकामी आवश्यक सुचना देवुन माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन, कैलास जगताप पोलीस यं◌ाचे भेटीसाठी रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही व पंच जितेश मराठे अशांनी कैलास जगताप पोलीस यांची देवळा पोलीस स्टेषनचे खालच्या मजल्यावर पार्किंगजवळ भेट घेतली असता, त्यांनी आमचेशी आमचेविरुध्द दाखल गुन्हयाविशयी चर्चा करून आमचे◌े विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयात आम्हाला अटक न करता, नोटीस देवुन सोडुन देण्यासाठी व त्या गुन्हयात मदत करण्यासाठी माझेकडे 20,000/- रू ची लाचेची मागणी केली व त्यापैकी 10,000/- रुपये आज व 10,000/- रुपये उदईक दि. 19/01/2025 रोजी स्विकारण्याचे मान्य केले. सदर बाबत सविस्तर पडताळणी पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला.

कैलास जगताप पोलीस यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम लगेच घेउन येण्याबद्दल मला सांगितले होते. त्याप्रमाणे दिनांक 18/01/2025 रोजी पंचासमक्ष सापळा पथक प्रमुख श्री एकनाथ पाटील सो यांनी लाचेच्या 10,000/- रुपये रकमेस अन्थ्रासीन पावडर लावून, त्याच्या गुणधर्मांची माहीती देउन व त्याचे प्रात्यक्षिक दाखवून आम्हाला व पंच श्री जितेश मराठे यांना आवश्यक त्या सुचना देउन माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन कैलास जगताप पोलीस यांना भेटण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे आम्ही व पंच जितेश मराठे अशांनी कैलास जगताप पोलीस यांची त्यांनी बोलविल्याप्रमाणे देवळा पोलीस स्टेशनचे खालील मजल्यावर पर्किंगजवळ येथे भेट घेतली असता, कैलास जगताप पोलीस यांनी आमचे कामाविशयी माझेशी चर्चाकरून, मला पोलीस स्टेशनच्या इमारतीच्या तळ मजल्यावरील 14 क्रमांक असलेल्या कर्मचारी विश्रामगृह या रुममध्ये मागणी केलेली 10,000/-रुपये लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारली. म्हणून त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. सदर कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी देवळ पोलिस ठाणे येथे मी, माझा भाउ धर्मा हिरामण मोरे ,व मामा जिभाउ नंदाळे यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात तपासी अधिकारी असलेले सहा. पोलीस उप निरीक्षक कैलास यशवंत जगताप वय 54 वर्षे, नेमणूक देवळा पोलिस स्टेशन, जिल्हा नाशिक ग्रामिण राहणार मं◌ुजवाड, ग्रामपंचायत समोर, ता. सटाणा जिल्हा नाशिक यांनी दिनांक 18/01/2025 रोजी 15.10 वाजेच्या सुमारास देवळा पोलीस स्टेशनच्या तळ मजल्यावरील 14 क्रमांक असलेल्या कर्मचारी विश्रामगृहात आमचे विरूध्द देवळा पोलिस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयात आम्हाला अटक न करता, नोटीस देवुन सोडुन देण्यासाठी व त्या गुन्हयात मदत करण्यासाठी माझेकडे 20,000/- रू ची लाचेची मागणी केली व त्यापैकी 10,000/- रुपये आज व 10,000/- रुपये उदईक दि. 19/01/2025 रोजी स्विकारण्याचे मान्य करून त्यापैकी 10,000/- रुपये लाच रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयाप्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेली आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

दि. 19/01/2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Dnyaneshwar Nivrutti Jadhav(I (Inspector)) / PBMH77387 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
देहूगाव पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Dnyaneshwar Nivrut
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH77387



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner